




# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक १७६ वा ❑ शुक्रवार दि.२९ ऑगस्ट २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

## भारताव्यतिरिक्त या देशांममध्ये गणेशोत्सव केला जातो..

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य

गणेशोत्सव केवळ भारतातच साजरा केला जाणारा सण नाही तर जगातील इतर अनेक देशांमध्ये गणेश उत्सव मोठ्या थाटाने व आनंदाने साजरा केला जातो.

भारताव्यतिरिक्त इतर अनेक देशांमध्ये गणपतीची पूजा केली जाते.जपान, थायलंड, श्रीलंका इत्यादी अनेक देशांमध्ये केली जाते. याशिवाय, सर्वात मोठ्या काय  मुस्लिम देशातही भगवान गणेशाची पूजा केली जाते.

नेपाळ : नेपाळमध्ये, गणेश चतुर्थीला स्थानिक पातळीवर विनायक चतुर्थी म्हणूनही ओळखले जाते. ती मारु गणेश आणि सूर्य विनायक सारख्या मंदिरांमध्ये साजरी केली जाते . कुटुंबे घरी पूजा करतात, उत्सवाचे जेवण सामायिक करतात आणि मंदिरातील समारंभांमध्ये सहभागी होतात. नेपाळमध्ये हिंदू धर्म मोठ्या प्रमाणात पाळला जात असल्याने, येथील परंपरा भारतात पाहिल्या जाणाऱ्या परंपरांसारख्याच आहेत.

चीनमध्ये गणेशपूजा: काही प्रदेशांमध्ये गणेशाची पूजा संपत्ती आणि समृद्धीचे प्रतीक म्हणून केली जाते, बहुतेकदा स्थानिक रीतिरिवाजांमध्ये ती समाविष्ट केली जाते.

इंडोनेशिया:इंडोनेशियामध्ये श्री गणेशाला ज्ञानाचे प्रतीक मानले जाते.इंडोनेशिया हा जगातील सर्वात मोठा मुस्लिम देश आहे, परंतु तरीही येथे भगवान श्री गणेशाची पूजा केली जाते. काही वर्षांपूर्वी जेव्हा इंडोनेशियाची अर्थव्यवस्था खूप वाईट स्थितीत होती, तेव्हा तेथील सरकारने २० हजार रुपयांच्या नोटेवर गणेशजींचे चित्र छापले आणि काही वेळातच त्यांची अर्थव्यवस्था पुन्हा रुळावर आली. येथे भगवान श्री गणेशाला ज्ञानाचे प्रतीक मानले जाते.

कंबोडिया : कंबोडियामध्ये गणेशाची पूजा ख्मेर साम्राज्यापासून सुरू होते , जिथे अंगकोर वाट सारख्या मंदिरांना अजूनही देवतेचे कोरीवकाम शोभते .आजही, कंबोडियन हिंदू गणेश चतुर्थी प्रार्थना आणि नैवेद्य दाखवून साजरी करतात, शतकानुशतके चालत आलेली परंपरा जिवंत ठेवतात.

मलेशिया : मलेशियामध्ये, हिंदू समुदाय गणेश चतुर्थी मोठ्या उत्साहात साजरी करतो. क्वालालंपूरमधील श्री सिठी विनायगर सारख्या मंदिरांमध्ये सामुदायिक प्रार्थना, सांस्कृतिक कार्यक्रम आणि उत्सवाचे जेवण असलेले अनेक दिवसांचे कार्यक्रम आयोजित केले जातात. येथे, गणेशाची विशेषतः नवीन सुरुवातीची देवता म्हणून पूजा केली जाते .

जपान : जगातील सर्वात तंत्रज्ञानाने प्रगत देश असलेल्या जपानमध्ये भगवान गणेशाची पूजा केली जाते. येथे त्यांना कांगितेन म्हणतात, ज्याचा अर्थ आनंदाचा देव आहे. येथे श्री गणेशाची अनेक रूपे लोकप्रिय आहेत. येथेही चार भुजा असलेल्या गणपतीची विशेष पूजा केली जाते.

श्रीलंका:भारताच्या शेजारील देश श्रीलंकेतही गणेशाची अनेक मंदिरे आहेत. येथे, तमिळ बहुल भागात, काळ्या दगडापासून बनवलेल्या गणपतीची पूजा केली जाते आणि येथे त्यांना पिल्लयार म्हणतात. श्रीलंकेत गणेशाची एक-दोन नाही तर १४ प्राचीन मंदिरे आहेत. येथे, बौद्ध मठांमध्येही गणपतीच्या मूर्ती दिसतात.

थायलंडम:थायलंडला हत्तींचा देश म्हटले जाते. येथील बहुतेक लोक बौद्ध आहेत. येथे भगवान गणेशाची पूजा फ्रा फिकनेट म्हणून केली जाते, ज्याचा अर्थ सर्व अडथळे दूर करणारा देव आहे. येथे कोणत्याही शुभ कार्यापूर्वी भगवान गणेशाची पूजा करण्याची प्रथा आहे. येथे गणेशोत्सव देखील मोठ्या थाटामाटात साजरा केला जातो. विशेष म्हणजे यावर्षी थायलंडमध्ये सर्वात उंच गणेश मूर्ती स्थापन करण्यात आली आहे. थायलंड मधील चाचोयंगसाओ प्रांतातील खलोंग खुएं गणेश आंतरराष्ट्रीय उद्यानात भगवान गणेशाची जगातील सर्वात उंच मूर्ती आहे .या मूर्तीची उंची सुमारे तब्बल ३९ मीटर अर्थात १२८ फूट आहे या त्यामध्ये पुतळ्याची उंची सुमारे ३० मीटर आहे आणि उर्वरित उंची त्याची विशाल पायरी आहे त्याची भव्यता बारा मजली इमारती इतकी उंच आहे.

थायलंड मधील गणेश पुतळा ८५४ कास्य धातूंच्या तुकड्यांपासून बनविला आहे या पुतळ्यामध्ये भगवान गणेशाचे चार हात आहेत त्यात त्यांनी ऊस आंबा फणस आणि केळी धरली आहे हे सर्व थायलंडच्या शेती आणि हिरवळीची प्रतीक मानले जातात डोळ्याच्या पायाजवळ एक मोठा उंदीर देखील बसलेला आहे ज्याच्या हातात मोदक आहे इतकेच नाही तर ही मूर्ती असलेले उद्यान चाळीस हजार चौरस मीटर आहे ते थायलंड मधील सर्वात प्रसिद्ध उद्यानापैकी एक आहे.

या देशांशिवाय  तिबेट , म्यानमार,व्हिएतनाम  मंगोलिया या देशांमध्ये देखील गणेश पूजा केली जाते.तिबेटी बौद्ध धर्मात विनायक म्हणून त्याचा समावेश होतो



ज्योतिर्मय साहित्य - संपूर्ण महाराष्ट्रातील लोकप्रिय असा दगडूशेठ हलवाई गणपती मंदिराच्या समोर ऋषीपंचमीनिमित्त गणेशोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी ३५ हजार पेक्षा अधिक महिलांनी अथर्वशीर्ष पठण व महाआरती केली. आणि मागच्या वर्षीचे रेकॉर्ड मोडले, श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्टतर्फे याचे आयोजन करण्यात आले होते.

# लेकरांच्या स्वप्नांसाठी संघर्ष....




ज्योतिर्मय साहित्य

नववीमधून शाळा सोडून दिली आणि मुळशी गावांमध्येच मिळेल ते काम करीत स्वतःची दोन एकर जिराईत जमीन कसत २००० साली ३५ कि.मी. वर असलेल्या पुण्यात येऊन आपल्या पाल्यांसाठी संघर्षमय जीवन जगणाऱ्या दिनेश कचरू नकती या ४७ वर्षीय व्यक्तीची गोष्ट समाजातील सर्वांना प्रेरणादायी आहे.सध्या ते सकाळी साडेनऊ पर्यंत बरीच वर्षे करीत असलेल्या गाडी धुण्याचे काम ते करतात. साडेनऊ ते सहा पर्यंत एस.बी. हेडकॉन या इंडस्ट्रीच्या गोडाऊन मध्ये काम करतात आणि सायंकाळी सहा ते साधारण रात्री दहा पर्यंत दीड वर्षापूर्वी साठवलेल्या पैशातून तीन लाख वीस हजार रकमेला घेतलेली स्वतःची रिक्षा चालवितात. साधारणपणे या तिन्ही रोजगाराच्या माध्यमातून त्यांना तीस हजार रूपये महिना धनप्राप्ती होते. हे सर्व ते करतात त्यामागे महत्वाचे कारण म्हणजे आपल्या दोन मुली आणि एक मुलास शिक्षण देणे हे होय. लेकरांच्या स्वप्नांसाठी शिक्षण आवश्यक आहे ही जाण आणि जाणीव नववी शिकलेल्या दिनेश नकती यांना आहे. मुळशीच्या डोंगर कड्यातून पुण्यापर्यंतचा प्रवास, पुण्यात स्थाईक होणे यासाठी त्यांचा कष्टाबरोबरचा चांगुलपणा आणि साधी राहणी पण उच्च विचारसरणी त्यांना यश मिळवून देत आहे. दिनेश नकती यांच्या स्वप्नांना स्वतः साठी कोणतेही मखमली रंग नाहीत. त्यांची मुले अनुक्रमे अनिशा ही सध्या आबासाहेब गरवारे कॉलेजमध्ये बी.कॉम. च्या तिसऱ्या वर्षाला, सानिका ही याच कॉलेजच्या १२ वी सायन्सला आणि आदेश हा मुलगा भारती विद्यापीठच्या इंग्रजी माध्यमाला ८ वीत शिकत आहे. दोन मुलींच्या डोळ्यात चमकणारा शिक्षणाचा रंग आणि मुलाच्या भवितव्याचा उजेड त्यांना दिवसभर कष्ट करण्याची प्रेरणा देत आहे. मुलांना पुस्तकी ज्ञान आणि चांगले जग मिळावे यासाठी चाललेली त्यांची धडपड प्रेरणादायी आहे. दिनेश यांच्या रिक्षेतून २३ ऑगस्ट २०२५ रोजी प्रभात रोड ते स्वारगेट एसटी स्टँड मी प्रवास केला. रिक्षा चालक-मालक दिनेश यांच्याशी गुजगोष्टी करताना त्यानी दिलेली माहिती,नववी शिकलेल्या व्यक्तीला पुण्याने दिलेल्या रोजगार संधीची स्पृहणीय अशी गोष्ट आहे. स्वतःचे व्यक्तिमत्व घडवीत आपले कुटुंब हेच प्रगतीसाठीचे ध्येय मानणाऱ्या कुटुंबवत्सल व्यक्तीचे हे उदाहरण समाजाला आदर्शवत आहे.

२००० साली पुण्यात आल्यावर भांडारकर रोडवरील पण लॉकडाऊन मध्ये बंद पडलेल्या एफिशियन किचन ट्रॉली या शंकर गोडबोले यांच्या दुकानात १७ वर्षे दिनेश यांनी प्रामाणिकपणे काम केले. २००४ साली मनिषाशी लग्न झाले आणि त्या उत्तम गृहीणी म्हणून संसाराचा गाडा व्यवस्थीत चालवीत आहेत. किचन ट्रॉलीचे दुकान बंद पडल्यानंतर रोजगाराचा प्रश्न आ वासून उभा राहिला. पण दिनेशचा चांगुलपणा एवढा होता कि,



संवेदनशील शंकर गोडबोले यांनी त्यांना आपले मेहुणे यांच्या आयडियल फर्म मध्ये काम मिळवून दिले.तीन-चार वर्षे तिथे काम केल्यानंतर दिनेश यांनी एस.बी. हेडकॉन इंडस्ट्रीच्या गोडाऊनमध्ये नोकरी करीत आपल्या मुलांचे शिक्षण अत्यंत उत्कृष्टपणे चालू ठेवले आहे.कोथरूड मध्ये जय-भवानी नगर शेजारी दोन रूम म्हणजे एकावर एक असलेल्या जागेत आपला सुखाचा संसार ते करीत आहेत. दिवसामधील १५-१६ तास पडेल ते काम करीत स्वतःची रिक्षा घेणारे हे व्यक्तिमत्व समाजासाठी आदर्श आहे. त्यांच्याशी गप्पा मारताना नववीपर्यंतच शिक्षण घेतलेल्या दिनेशने समाजातून मिळविलेले शिक्षण आणि त्यामुळे मुलांचे शिक्षण हेच ध्येय मानणाऱ्या व्यक्तिमत्वाची खरी ओळख पटते.

निर्व्यसनी असणाऱ्या दिनेशसारखी हजारोंनी व्यक्तिमत्वे आज महाराष्ट्रातून आणि देशातून शिक्षणाचे हब असलेल्या पुण्याकडे रोजगारासाठी झेपावत आहेत. रोजगाराच्या विविध संधी उपलब्ध करून देणारे पुणे हे साता-यापासून फक्त ११० कि.मी. वर आहे. तरुण पिढीला वेगवेगळ्या क्षेत्रात संधीचे दार उघडुन देणारे पुणे वेगवेगळ्या ठिकाणांचा विचार करता साधारण ५० कि.मी. ते १५० कि.मी. अंतरावरून सातारा जिल्ह्यातील सर्वांना प्रगतीसाठी उपलब्ध आहे.

दिनेश याच्या कुटुंबाची कथा केवळ मुळशी गावातून पुण्यावर आलेल्या एका कुटुंबाची नाही, तर आपल्या समाजातील असंख्य संघर्षरत कुटुंबाची' आहे. मुलांना शिकविण्यासाठी आयुष्यभर श्रम करून कष्टाची शिदोरी घेत प्रत्येक सकाळी एक नवीन स्वप्न पदरात घेऊन कामाला निघालेले आई-वडील त्यांचा घाम, अश्रू आणि त्यांच्यातील न संपणारी आशा नागरी जगात उदंड भविष्य फिरवणाऱ्या झगड्यालाच सलाम करतात. दिनेश सांगत होता.... मी, माझी पत्नी, तिन्ही मुले याच रिक्षातून मुळशीला जातो आणि दोन एकर जिराईत भात शेती फुलवतो. सध्या मजूरच मिळत नाहीत.अशा वेळी शेजारच्या, आजूबाजूच्या शेतकऱ्यांच्या शेतावर त्यांच्यासह आम्ही काम करतो आणि आमच्या शेतावर आम्हाला मदत करण्यासाठी ही शेतकरी कुटुंबे येतात. पुन्हा एकदा समाजातील एकमेकाला मदत करण्याचा नवीन पायंडा मजूर मिळत नसल्यामुळे चालू झाला आहे. जो नक्कीच सामुदायिक शेती पिकविणे या कल्पनेला पाठींबा देत आहे. नवी समाजरचना या गोष्टींमुळे निर्माण होत आहे. ज्यामुळे एकमेकाचे सुख दुःख संवेदनेने जाणून घेण्याचे, जपण्याचे, माणूस म्हणून जगण्याचे परिमाण यासाठी मिळत आहेत. **(क्रमशः)**

## वास्तुशास्त्र पेंटिंग



लघुलेख - 29

आपला 'मानव' नावाचा प्राणी इतका हिंस्त्र' आहे की, अवघ्या १०० वर्षापूर्वी पृथ्वीवर ७ अब्ज हेक्टर वर जंगल होते, मानवाने ते जंगलतोड करून इतके संपवले आहे की आता ते जेमतेम दीड अब्ज हेक्टर वर उरले आहे.

आपली म्हणजे भारतीय संस्कृती ही अतिप्राचीन असून या संस्कृतीत निसर्गालाच देव-देवतांचे स्वरूप मानलेले आहे, आपण वाचत आहात ते "वास्तुशास्त्र पेंटींग" हे पूर्णतः निसर्गानुसारी आहे.


विश्वाचा पसारा, ब्रह्मांड किंवा युनिव्हर्स हे इतके मोठे आहे की ग्रामीण भागातून रात्री आकाशात पाहीले तर आपल्याला "आकाशगंगा" दिसते. अशा असंख्य "आकाशगंगा", या ब्रह्मांडात आहेत, याचा शोध आपल्या पूर्वजांनी प्राचीन काळीच लावलेला आहे. या आकाशातच आपणांस "नक्षत्र" दिसतात. एकूण २७ नक्षत्र आहेत. (कालच्या लघुलेखात चुकून २० असा अंक पडला आहे) त्यांचा विशिष्ट स्थितीतील आकारातील "तारकांचा आकार" आपणांस जाणकारांकडून समजून घेवून,पाहता येतो.

या सर्व नक्षत्र, तारे, आकाशगंगा यांच्या मध्य बिंदू भोवती एक प्रदक्षिणा पूर्ण करण्यास सूर्याला २० कोटी वर्षे लागतात.असे अगणित सूर्य जिच्या भोवती फिरतात ती, आपल्याला दिसणारी 'आकाशगंगा'...!! अशा अनंत कोटी, आकाशगंगा सहीत नक्षत्र, ताऱ्यांसह ब्रह्मांडाचा निर्माता....कर्ता, तो ईश्वर.... ज्याचा शोध घेण्याचे काम आजही तपस्वी, योगी, मुनी, साधक आणि शास्त्रज्ञ अजुनही करितच आहेत. आपले मनुषीमुनी हे लौकिक अर्थाने शास्त्रज्ञच...!!

आपल्या योग सामर्थ्याने, सूक्ष्म देहाने ऋषी मुनींनी विश्वभर भ्रमण केलेली अनेक उदाहरणे आपणास वाचावयास मिळतात. शास्त्रज्ञांना आज चंद्र-मंगळ ग्रहांवर जायला अब्जावधी रुपयांचा खर्च येतो. हे आपण वाचतो. त्या ग्रहांवर ब्रह्मांडभर सूक्ष्मदेहाने, योग सामर्थ्याने, आत्मबलाने ऋषीमुनींनी फार प्राचीन काळी जाऊन येऊन अनेक ग्रंथाची निर्मिती केली आहे. अनेक मंत्र श्लोक लिहून ठेवले आहेत, प्रत्येक ग्रह, नक्षत्र, तारे यांचे रंग कोणते आहेत? त्यांचं स्वरूप कसे आहे ? या व अशा अनेक प्रश्नांची उत्तरे त्यांनी शोधण्यात यश मिळविलेले आहे. त्या संदर्भातूनच 'वास्तुशास्त्र पेंटींग' हा अद्भुत विषय निर्माण करता आला...

क्रमशः.....

द्वारा एस्.व्ही.एस्. कला प्रतिष्ठान
डॉ. गजानन शेपाळ : 98691 30238



# जात्यावरच्या ओव्या.....

---


सावळी सुरत
आली फिरत फिरत
डोईचा रुमाल
नाही नजर पुरत ||२२९||

गोरी मही बाई
मी न सावळ्याला दिली
मोती पवळ्याची
मी न मिळवणं केली ||२३०||

---

संदर्भ - शांताई इंगळे
संकलन - सौ. मनोरमा बोराडे
सहशिक्षिका, छत्रपती संभाजीनगर

## उगवतीचे रंग



विश्वास देशपांडे
चाळीसगाव
मो.९४०३७४९३९२

# मोल

ज्योतिर्मय साहित्य

आजच्या दिवसात खरं निरपेक्ष प्रेम दुर्मिळ होत चाललं आहे. आज आपण प्रत्येक नातं, प्रत्येक कृती पैशात मोजतो.

आईच्या मायेचं मोल काय?

मित्राच्या आधाराचं मोल काय?

देशासाठी लढणाऱ्या सैनिकाच्या प्राणांचं मोल करता येईल ?

प्रेमाचा, करुणेचा, सन्मानाचा दर लावता येईल का?

कृष्णाच्या या छोट्याशा प्रसंगातून आपल्याला जाणवतं

खरं मोल हे भावनेचं, भक्तीचं, नि:स्वार्थ देणगीचं असतं.

देवासाठी आणि जीवनासाठीही.

मोल म्हणजे पैशाने विकत घेता न येणारी ती आत्मीयता.

कारण खरं मोल हे कधीच नाण्यांच्या खणखणाटात नसतं, ते असतं माणसाच्या हृदयातल्या नि:स्वार्थ भावनेत..

मोल नेहमीच पैशांत नसतं! पैशात ते करता येतही नाही.

मोल जो जाणेल त्याच्यासाठी असतं.

ते आईच्या डोळ्यातल्या पाण्यात असतं.

ते मित्राच्या खांद्यावरच्या आधारात असतं.

ते भुकेल्याला दिलेल्या अन्नात आणि त्याच्या चेहऱ्यावर झळकणाऱ्या तृप्ततेत असतं.

ते मनुष्यत्वाच्या स्पर्शात असतं. धीराच्या शब्दात असतं.

प्रेमळ, आश्वासक स्पर्शाचे कधी मोल करता येईल का ?

कुसुमाग्रजांच्या कणा कवितेतील पाठीवर आधाराचा हात ठेवून लढणाऱ्या गुरुजींच्या आश्वासक स्पर्शाचं मोल होऊ शकेल का ?

जगाच्या पाठीवर या चित्रपटात एक सुंदर गाणं आहे. सिद्धहस्त कवी ग दि माडगूळकर यांचे शब्द आहेत. आशा भोसले आणि सुधीर फडके यांच्या अजरामर स्वरात हे गाणं आपल्याला ऐकायला मिळतं. नाही खर्चली कवडी दमडी, नाही वेचला दाम बाई मी विकत घेतला श्याम.



कवडी दमडी किंवा दाम म्हणजे पैसा दिला नाही. मग तरीही हा श्याम कसा विकत घेतला ? तर त्याचं उत्तर गाण्यातच पुढे मिळतं. कवी म्हणतो –

जन्मभरीच्या श्वासाइतुके मोजियले हरिनाम.

हे त्याचं मोल आहे. आणि हे मोल देऊन ज्याला विकत घेतलं आहे तो कोणी साधासुधा नाही...

हाच तुक्याचा विठ्ठल आणि दासाचा श्रीराम... आहे.

तेव्हा मोल द्यायचं तर ते असं. आणि घ्यायची ती अमूल्य वस्तू !

''पैशाचे मोल संपतं, वस्तूचे मोल कमी होतं, पण प्रेमाचं, श्रद्धेचं आणि विश्वासाचं मोल कधीच कमी होत नाही.''

खरं मोल हे पैशानं नव्हे, तर भावनेनं मोजायचं असतं. प्रश्न फक्त एवढाच आहे आपण आपल्या नात्यांत आणि कृतींमध्ये अजूनही 'मोल' शोधतो ते नाण्यांत की नि:स्वार्थ प्रेमात ?''

आपल्या जीवनातलं खरं मोल काय याचं उत्तर आपणच स्वतःला द्यायचं आहे.''

## दासबोध स्तवन





उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

# बद्धलक्षण

ज्योतिर्मय साहित्य

दशक ५ समास ७

नमस्कार,


समाजातील सर्व माणसे ही एकसारखी नसतात. कोणी अतिशय हुशार असतात तर कोणी सर्वसामान्य विचार सरणीची असतात. पण काही जण मात्र जगातले सर्व ज्ञान फक्त माझ्या कडेच आहे आणि समोरचा कसा बेअकली आहे ह्या विचाराचे असतात. आणि अशी माणसे घमेंडखोर असतात. स्वतः ला खुप शहाणे समजतात. पण या लोकांची ही विचारसरणीखुप दिवस टिकत नाही. एक ना एक दिवस अशा लोकांचे पाय जमीनीवर येतात.

. समर्थानी या लोकांच्या विषयावर हा समास बेतलेला आहे. तात्पर्य काय तर प्रत्येकाने साधकबाधक विचार करून वागावे. कधीही गर्व करू नये.

आता आपण पारमार्थिक क्षेत्रात बद्ध जीवांची लक्षणे अभ्यासु. पारमार्थिक प्रगति म्हणजे आरंभापासून अंतबिंदूकडे अधिकाधिक सरकणे होय. अज्ञान काय सांगते? तर अज्ञान सांगते की, मी खरा आहे. देवधर्म यात त्यांना काहीच रस नसतो. ज्ञान सांगते की, मी खरा नाही देव खरा आहे. ज्या प्रमाणांत माणसांच्या मी पणाचे, अहंकाराचे खरेंपण कमी कमी होत जाईल. त्या प्रमाणात देवाचे खरेपण त्याच्या अनुभवास येईल. अज्ञानाचे मुख्य कारण असणारा देहाभिमान कमी कमी होत जाणे हें पारमार्थिक प्रगतीचे मुख्य लक्षण होय.

समर्थानी अज्ञानी माणसाला बद्ध असे नाव दिले. तर संपूर्ण आत्मज्ञानी माणसाला त्यांनी सिद्ध म्हणजे प्राप्त झालेला असे नाव दिले.

(क्रमशः)



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

# नामाचे प्रेम नामाच्या सहवासाने येईल

ज्योतिर्मय साहित्य

नामाचे प्रेम येण्यासाठी आपल्या प्रेमळ आईकडेच बघा. मुलाला जरा ताप आला तरी आईच्या पोटात धस्स होते, अन्न गोड लागत नाही, झोप लागत नाही, अशा अनेक गोष्टी होतात. थोडक्यात म्हणजे, तिला सर्व बाजूंनी अस्वस्थता उत्पन्न होते. नाम घेण्यात थोडा व्यत्यय आला तर आपली स्थिती तशी होते का ? याचे उत्तर आपल्याला स्वत:कडूनच मिळण्यासारखे आहे. नाम घेणे हा माझा धर्म आहे, ते माझे आद्य कर्तव्य आहे, त्याच्याशिवाय जगणे म्हणजे मेल्यासारखेच आहे, नाम घेण्यात माझे आत्यंतिक हित आहे, किंबहुना मी नामाकरिताच जन्माला आलो आणि तद्रूपच होऊन जाईन, इतक्या प्रज्वलित भावनेने नाम घेणे जरूर आहे; आणि मग प्रेम आले नाही ही गोष्ट शक्यच नाही. प्रेम येत नाही याचा अर्थच हा की, आम्ही नाम खऱ्या आस्थेने घेत नाही. ह्या सर्वांवर उपाय म्हणजे नाम घेण्याच्या निश्चयाने, ते जसे येईल तसे घेत राहणे. तेच नाम आपल्याला एक एक पाऊल पुढे नेऊन ध्येय गाठून देईल. ' परिस्थिती चांगली आली म्हणजे नाम घेईन ' असे म्हणणारा मनुष्य नाम कधीच घेत नाही. नाम हे मनात किंवा उच्चार करूनही घेता येते. नामात राहावे, म्हणजे अंत:करणाची शुद्धता होईल, आणि अंत:करण शुद्ध झाले की भगवंताचे प्रेम येईल. नुसत्या पुष्कळ जपापेक्षा, विवेकाने आणि विचाराने आलेले प्रेम नामात असणे जरूर आहे. खरे म्हटले म्हणजे नामातच नामाचे प्रेम आहे. ताकात लोणी असतेच, फक्त ते वर दिसत नाही; पण ताक घुसळल्यावर जसे ते वर येते, तसे भगवंताचे नाम आपण घेतले की त्याचे प्रेम आपोआप वर येते. साध्या शब्दांचादेखील आपल्या वृत्तीवर परिणाम होऊन, तो तो भाव आपल्या मनात जागृत होतो, मग भगवंताच्या नामाने भगवंताचे प्रेम का येणार नाही ? आज तुम्हाला जेवढा वेळ रिकामा मिळतो, तेवढा सगळा भगवंताच्या नामात घालवण्याचा प्रयत्न करा. पुष्कळ दिवस एका घरात राहिल्याने त्या घराविषयी आपल्याला प्रेम येते ना ? प्रपंचाचे प्रेम आपल्याला सहवासाने आले आहे. तसे नामाच्या अखंड सहवासाने त्याचे प्रेम आपोआपच येईल. उठता-बसता, चालता-बोलता, आपण अनुसंधान ठेवण्याचा प्रयत्न करावा. कोणतेही व्यसन कालांतराने पचनी पडते, आणि मग मनुष्य जास्त जास्त त्याच्या आधीन जातो. अफूचे पहा ! दिवसेंदिवस त्या माणसाला जास्त अफू लागते. त्याप्रमाणे भगवंताच्या चिंतनाचे आपल्याला व्यसन लागले पाहिजे. कोणतीही चांगली गोष्ट साधायला कठीण असणारच; पण अगदी थोड्या श्रमात पुष्कळ साधून देणारे नामासारखे दुसरे साधन नाही. म्हणून नेहमी मनाने नाम घेत असावे.

८. नामाचे प्रेम यायला, एक, गुरूंना ते आवडते म्हणून घ्यावे, किंवा दुसरे, नामातच माझे कल्याण आहे, या भावनेने घ्यावे.

## ॥ संत महात्म्य ॥

लेखक - मधुकर बोरीकर
9403061886

# संत ज्ञानेश्वर महाराज यांचा अभंग

ज्योतिर्मय साहित्य

मनाचा मृत्यू म्हणजे समाधी ही व्याख्या आपण पूर्वी ऐकलेली आहे ज्यावेळेस प्राण उर्ध्वगामी होतो मन जवळपास संपल्यात जमा असते मी तू पणाची जाणीव उरतच नाही बुद्धीही कुंठीत होते आणि अहंकार लीन असतो त्यावेळेसच अविद्येचे मळभ संपल्या जाते. सूक्ष्म स्तरावरील विकारांचे जमाव नष्ट केले जातात. योगाग्नीने शरीरात अग्नि तांडव सुरू केलेले असते. यामध्ये पापांची किल्मिशे जळून भस्म होतात. मन निष्पन्द असते. जाणीव तर असते पण ती कोणाला येते याविषयी शब्दात मांडणे अवघड जाते. अशा वेळेस आत्मा पुन्हा तेजपुंज स्वरूपात बुद्धीवर प्रकाश टाकतो म्हणून हृदयस्त परमात्मा म्हणजेच आत्मा हा तेजोमय रीतीने लकाकला आहे, त्या तेजाचे वर्णन ज्ञानेश्वर माऊली येथे असे करीत आहेत.

साकार निराकार शून्या शून्य दिठा
रुपी रूप वाटा हरी माझा

साधनेच्या निम्नस्तरावर भगवंताचे सगूण रुप दर्शन होत असते. या सगुणाच्या दर्शनानंतर त्याची साधना निर्गुण निराकार परमात्म्याच्या अनुभव घेण्यासाठी पुढे सरकते. यानंतर ज्ञानप्राप्ती म्हणजेच आत्म्याचा अनुभव येतो. हा निर्गुण निराकार परमात्म्याचा अनुभव आहे. आत्मा व परमात्मा हे एकच आहेत हे आता जाणवते.

ही साधना ज्ञानानंतर पुढे सविकल्प समाधी चा अभ्यास दृढ करून नंतर निर्वी कल्प समाधीकडे झेप घेते. या निर्वी कल्प समाधीत एक उच्चतम अनुभव आहे. तो म्हणजे महा शून्याचा. हा महा शून्याचा अनुभव, करोडो करोडो लोकांमधून एखाद्याच भाग्यवंतास अनुभवता येतो.

आपल्या भोवती काहीही नाही. केवळ निर्वात पोकळी आहे. खूप अंधकार दाटलेला आहे. या पोकळीचा आदी अंत कुठेच लागत नाही.हे केवळ जाणवते. पण देह भावांना पूर्णपणे संपलेली असते. मन हे जवळपास मेल्यात जमा असते. विचार नसतातच फक्त या निर्वात पोकळीचा अनुभव घेणारा कोणीतरी आहे. त्यास अनुभव येत आहेत असे भासते. ही समाधीची प्रगाढ अवस्था आहे. यात साधक बऱ्याच वेळेस बाहेर कसे पडावे हे त्याला कळत नाही. या समाधीत अखंड अमर्याद महानंद मिळत असतो.

सर्वत्र अंधकार दाटला आहे. निर्वात पोकळी आहे, आणि काहीही नाही हा निर्गुण निराकार परमात्म्याचा प्रत्यक्ष अनुभव असतो.अनाहत नादाच्या साथीने सद्गुरु शिष्यास यातून बाह्य जगतात परत आणतात व लोक कल्याणाची कामे करण्यासाठी त्यास उपदेश करतात.

तुज सगुण म्हणू की निर्गुण रे
सगुण निर्गुण एक गोविंद रे

हा सगुणा पासून निर्गुणा पर्यंत आणि निर्गुणात येताच महा शून्याचा महानुभव माऊलींनी घेतला व त्यांचा आत्मा हाच परमात्मा आहे यांचे विषयी त्यांचा निश्चय झाला. ही अवस्था त्यांच्या असा साधनेने परिपुष्ट झाली व त्यांच्या उपादेय हृदयात रखुमाईचा पती तो परमात्मा स्थिर झाला. हा परमात्मा अनेकांना केवळ मुर्तीतच

आहे असे वाटते ही उफराटी कळा म्हणजे चुकीची बाजू आहे असे माऊली म्हणतात.

असे अनुभव जेंव्हा मनात शब्दच नाहीत अशा अवस्थेत मांडले आहेत. हे कोणत्या शब्दात मांडता येतील हे किती कठीण काम आहे ?तरीही माऊलींचे सामर्थ्य इतके की त्यांनी चपखल शब्दात हे दिव्य अनुभव मांडलेले आहेत.

या ज्ञानियांच्या राजास गुरु, महाराजांस विनम्रपणे अभिवादन करून हा लेख इथे संपवितो.

## ॥ निरूपण ॥




ह.भ.प. चंद्रहास शास्त्री सोनपेठकर

ज्योतिर्मय साहित्य

५०. सदा सोबती तू कृपाकारिणी तू
न लागे तुला सांगणे रेणुकांबेहिता जाणते तू सुताच्या सदा हो ।तुझे लक्ष माझ्याकडे नित्य राहोमला ।मराला तुझी ओढ लागो ।।
भ्रमे विभ्रमे चित्त माझे तरीहीक्षमा तू करीशी समीपे बसोनी।मला सांगते तू हिताच्या प्रयुक्तीकधी दिव्य गोष्टी शिवे तू हसोनी।।
जगी तू वरिष्ठा तथा वत्सला तूतुझे प्रेम माये असे सर्व माझे ।सदा सोबती तू कृपाकारिणी तूतुझे प्रेम माये असे सर्व माझे ।।
५१. मना, रूप ते अम्बिकेचे स्मरावे
मना, रूप ते अम्बिकेचे स्मरावे
तुझे मागणे जे, तिला तू वदावे ।मनुष्यां न काही, तुवा रे वदावेखरे एक बाळा, तिने जे दिले ते ।।
तुला नित्य सांभाळिलेसे तिने रेतुला नित्य संरक्षिलेसे तिने रे ।असे नित्य पाठी, तुझी कामधेनुतरी का करीशी, मनी काळजी रे ।।
न मागे कुणाला कधी लेकरा तूतिचे पादपद्मी, मना बैसवी तू ।दिले जे तिने ते कधी ना सरे रेतिला सांग जे जे हवे ते तुला रे ।।

## ॥ श्री राम कथा ॥





वक्ते : आदरणीय श्री चैतन्य महाराज देगलूरकर

ज्योतिर्मय साहित्य

कोणाचा दृष्टांत...

विभीषणहाने तुमच्या शिवाय मी कोणास शरण जावे?

भगवान म्हणतात ना मला शरण आला त्याचे रक्षण मी करतो.कारण जगात शरन्य केवळ मी आहे.स्वतःला वेगळे न समजता मला एकरूप होणे हे शरण होय.

कथा ऐकता ऐकता धावते संकलन
मधुकर बोरीकर, 9403061886

बिभीषण आला.चरणावर मस्तक ठेवले सर्व लोकात तुम्हीच एकमेव शरन्य असेल. मी सर्व सोडून आला.मी लंकेचा परित्याग केला.मी मित्रा सोडले धन सोडले.असा निःसंग होऊन आलो.सर्वांना हे आवडले. रामानी त्यास तुला रावण वधानंतर लंकेच्या गादीवर बसविण्याचे वचन दिले.

लक्ष्मण म्हणे तुम्ही असे वचन लगेच द्यायला नको म्हणे. कारण समाज रावण शरण आला तर तुम्ही त्यास मारू शकणार नाही मग याला गादीवर कसे बसविणार?

राम म्हणाले असे झालेच तर मी अयोध्येचे राज्य बिभीषणास देईल.

पुन्हा एकदा सामोपचाराचा प्रयत्न केला पण उपयोग झाला नाही.

समुद्रांनी ३ दिवस वाट पाहूनही दिली नाही शेवटी धनुष्य वर बाण चढविला की घाबरून सह कुटुंब प्रकट झाला. तुम्ही सत्र काढल्या शिवाय प्रकट झाला नाहीत. समुद्र म्हणे मी तुमचा पूर्वज आहे तुम्ही माझे वंशज आहात पण खरे सांगतो तुमची मला लाज वाटते, तुमचे तोंड पाहण्याची लाज वाटते.

(क्रमशः)



## आरोग्य संजीवनी

# गरोदरपणात तूप स्त्रीच्या आरोग्यासाठी फायदेशीर

ज्योतिर्मय साहित्य

आई होण्याचे स्वप्न पाहण्यापासून ते आई होण्यापर्यंतचा प्रवास स्त्रीसाठी खूप रोमांचक, भावनिक आणि जबाबदार असतो. आईच्या आरोग्यासाठी आणि बाळाच्या विकासासाठी गर्भधारणेपासून नवव्या महिन्यापर्यंत गर्भवती महिलेच्या आहाराची अत्यंत काळजी घेतली जाते. या काळात चांगले अन्न, औषधोपचार, व्यायाम, चांगली पुस्तके, आजूबाजूचे चांगले वातावरण हे खूप महत्त्वाचे आहे. गरोदरपणात भरपूर फळे, भाज्या, पातळ प्रथिने आणि हेल्दी खाण्याचा सल्ला दिला जातो. कारण गर्भधारणेदरम्यान स्त्री जे काही खाते त्याचा तिच्या आणि मुलाच्या आरोग्यावर खूप परिणाम होतो. जेव्हा मूल पोटात वाढत असते तेव्हा त्याची आई त्याच्या अन्नाचा स्त्रोत असते. आई जे काही खाते ते थेट मुलाला जाते. म्हणूनच अनेक स्त्रिया गरोदरपणात भरपूर तूप खातात.

गरोदरपणात तूप स्त्रीच्या आरोग्यासाठी फायदेशीर

प्रसूती-स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ राम्या काबिलन यांच्या मते, भारतीय स्वयंपाकात वापरल्या जाणाऱ्या मुख्य घटकांपैकी तूप एक आहे. जेव्हा एखादी स्त्री गरोदर असते तेव्हा तिला घरातील वडीलधारी मंडळी तूप खाण्याचा सल्ला देतात. गरोदरपणात

तूप खाणे स्त्रीच्या एकूण आरोग्यासाठी खूप फायदेशीर असते. हे पचनासही खूप मदत करते.

गरोदर स्त्रीने तूप खाल्ल्यास बाळ सहज बाहेर येते का...?

गर्भवती महिलेने तूप का खावे यावर प्रसूती-स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. रम्या कबिलन यांनी त्यांच्या 'इन्स्टाग्राम' पोस्टमध्ये स्पष्ट केले आहे. तुम्ही गरोदर असताना रोज एक चमचा तूप खा. तूप आईच्या आणि बाळाच्या आरोग्यासाठी फायदेशीर असते. पण अनेकदा असे सांगितले जाते की, गरोदरपणाच्या शेवटच्या महिन्यांत तूप खाल्ल्याने योनीमार्गातून बाळाला सहज बाहेर येण्यास मदत होते. मात्र हे खरे नाही, असे डॉक्टर सांगतात.

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

तूप बाळाच्या मेंदू आणि मज्जासंस्थेसाठी फायदेशीर...

पारंपरिक आयुर्वेदिक औषधांमध्ये शतकानुशतके तुपाचा वापर केला जात आहे आणि गरोदर महिलांसाठी याचे विविध आरोग्यविषयक फायदे आहेत. तुपामध्ये आवश्यक जीवनसत्त्वे असतात, जी गर्भधारणेसह बाळाच्या आणि आईच्या आरोग्यासाठी खूप चांगली असतात. गर्भवती महिलांना संपूर्ण गर्भधारणेदरम्यान उत्साही राहण्यास ते मदत करते. मुलाच्या मेंदू आणि मज्जासंस्थेच्या योग्य विकासासही मदत करते.

निरोगी त्वचा...


त्वचेची काळजी घेण्यासाठी आयुर्वेदिक पद्धतींमध्ये तुपाचा वापर अनेकदा केला जातो. गरोदर महिलांना गरोदरपणात त्यांच्या त्वचेत बदल जाणवू शकतात आणि तूप मॉइश्चरायझर म्हणून वापरल्यास किंवा त्वचेची काळजी घेण्यासाठी घरगुती उपाय केल्यास त्वचेचे पोषण आणि कोरडेपणा किंवा खाज कमी होण्यास मदत होते.

# क्रांतीचा रक्तरंजित इतिहास


**ज्योतिर्मय साहित्य**

रणाविन स्वातंत्र्य कुणा ना मिळाले तळहाती शीर घेऊन क्रांतिवीर लढले. असे भारतीय स्वातंत्र्यलढ्याचे खरे स्वरूप आहे. स्वातंत्र्य कुणी दान दिले नाही की भीक दिली नाही. तो आमचा हक्क होता. लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांनी न्यायालयास ठणकावून सांगितले होते की स्वराज्य हा माझा जन्मसिध्द हक्क (अधिकार) आहे आणि तो मी मिळवणारच. हे स्वातंत्र सहजासहजी मिळालेले नाही. स्वातंत्र मिळवणे याच उद्देशाने या स्वातंत्र्यसमरात क्रांतिवीर सहभागी झाले होते. आपले प्राण तळहातावर घेऊन हा संग्राम सुरू होता.

या संगरात जसे वीर होते तसेच वीरांगणाही होत्या. अनेक वीरांनी या यज्ञात आपली आहुती दिली, प्राणार्पण केले. घर दार शेतीवाडी या सर्वांचा त्याग केला इतकेच नाही तर आपल्या मुलाबाळांनाही रामभरोसे सोडले. या संग्रामात अनेक स्त्रियांनीही शूरपणे लढा दिला. केवळ इंग्रज सत्तेविरुध्द सत्याग्रह केला नाही तर सशत्र लढा दिला. अनेक वीरांगणांचा इतिहास आपल्याला माहीत नाही. मातांनी आपली मुले या स्वातंत्र्यसंग्रामात बळी दिली. अनेक पिढ्यांमध्ये बालवयातच क्रांतीचे बीज पेरले गेले होते. संपूर्ण भारतातून या लढ्यात स्त्रियाही हिरीरीने भाग घेत होत्या, अशाच तीस वीरांगणांचा इतिहास अर्चना देव यांनी संकलित करून भारतीय स्वातंत्र्यसंग्रामातील हिरकण्या या नावाने संकलित केला आहे.




कमला दासगुप्त यांची कहाणीदेखील हृदयद्रावक आहे. २२ मार्च १९०७ रोजी ढाका येथे त्यांचा जन्म झाला. कोलकत्याला त्यांचे शिक्षण झाले. बी.ए. ची परीक्षा होईपर्यंत त्या क्रांतिकारी नव्हत्या. त्यांनी इतिहासात एम. ए. ची पदवी मिळवली. शिक्षण सोडून तिने म. गांधींच्या साबरमती आश्रमात आल्या. घरून क्रांतीला विरोध असतानाही त्यांच्या मनात क्रांतीची बीजे पेरली गेली. १९२९ मध्ये त्या जुगांतर पक्षाचे काम करू लागल्या. घरच्या वादावादीमुळे तिने घर सोडले. महिला वसतिगृहाची ती अधीक्षक बनली. बाँब बनवायला शिकली. बाँब तयार करून स्फोटही घडवले परंतु स्वतःला अटक करू दिली नाही. ती इंग्रजांच्या हाती लागत नव्हती. १९३३ मध्ये तिला पकडण्याच इंग्रजांना यश आले. १९३६ मध्ये तिला कैदमुक्त केले. १९३८ मध्ये ती जुगांतर पार्टी सोडून भारतीय राष्ट्रीय काँग्रेसमध्ये सामील झाली. भारत छोडो आंदोलनातही सहभागी झाली. १९४६ ते १९७२ कोलकाताच्या आदर्श हिंदी विद्यालयात अध्यापनाचे काम केले. मंदिर नावाच्या पत्रिकेचे संपादन केले, रक्तेर अक्षरे, स्वाधीनता संग्राम मे नारी ही पुस्तकेही लिहिली. १९ जुलै २००० रोजी त्यांचे निधन झाले.




अशीच उदादेवी पासी ही क्रांतिकारक महिला. आपल्या वागण्याने ती जगराणी झाली. अवधच्या सैन्यात स्त्रीसैनिक म्हणून दाखल झाली. कमांडर पदापर्यंत पोचली. १६ नोव्हेंबर १८५७ मध्ये सिकंदर बागेच्या लढ्यात त्यांनी सहभाग घेतला. पुरुष वेष धारण करून ती प्राणपणाने लढली. ३४ सैनिकांना कंठस्नान घातले. त्या लढ्यात तिचा अंत झाला. लंडनमध्ये तिच्याबद्दल गौरवोद्गार काढले गेले.

अशीच कहाणी कल्पना दत्त तिने बंदुका आणि दारूगोळा हाताळला. १९३० मध्ये जवाहरलाल नेहरुंना अटक झाल्यावर महाविद्यालयात तिने संप घडवून आणला. १९३४ मध्ये तिला आजन्म कारावास झाला. १९३९ मध्ये प्रयत्नांती तिची सुटका झाली. १९४० मध्ये ट्रेडयुनियन लीडर झाली. पुरनचंद जोशी यांच्याशी तिचा विवाह झाला. राजकारणातून संन्यास घेतल्यावर चटगाव शस्त्रागार हत्याकांड हे पुस्तक तिने लिहिले. १९७५ मध्ये पहिल्या आंतरराष्ट्रीय महिलादिनी तिचा भव्य सत्कार झाला. ८ फेब्रुवारी १९९५ रोजी त्यांचे निधन झाले. अशी अनेक उत्कंठावर्धक प्रकरणे या पुस्तकात आहेत.

एकंदर भारतीय स्वातंत्रलढ्याचा शौर्य आणि पराक्रमाचा लढा या पुस्तकात वर्णिला आहे. इंग्रज सत्तेचे जुलमी राजवटीचे वर्णन वाचताना आपल्या हाताच्याही मुठी आपसूकच त्वेषाने वळतात. हुतात्म्यांचे बलिदानाने डोळे भरून येतात. त्यांचा त्याग पाहून डोळे पाणावतात.

पुरुषांनीच लढा दिला नाही तर स्वातंत्र्या बलिवेदीवर स्त्रियांनीही आपल्या रक्ताचे दान दिले आहे. त्यांच्या त्यागाची महती महान आहे. या सर्व महिलांनी सशस्त्र लढाच दिला. रक्तावीण का स्वातंत्र्य कुणा लाभले आहे. हे त्यांना ज्ञात होते. त्यांची ही वीरगाथा आहे.

भारतीय स्वातंत्र्यसंग्रामातील हिकरण्या
लेखिका - अर्चना देव
मूल्य ३०० रुपये
दत्ता डांगे, इसाप प्रकाशन नांदेड



## माती पासून पर्यावरण पूरक श्रीगणेश मुर्ती तयार करण्याची कार्यशाळा

**ज्योतिर्मय साहित्य**

**पुणे** - पेरीव्हींकल हायस्कूल सुस येथे भगवती सेवा आश्रम व जीवन कौशल्य विकास यांच्या संयुक्त विद्यमाने माती पासून पर्यावरण पूरक श्रीगणेश मुर्ती तयार करण्याची कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. त्यात प्रमुख प्राचार्या निर्मल पंडित, विभाग प्रमुख कनिष्ठ महाविद्यालय सचिन खोडले, कलाशिक्षक शिवराज कदम यांचा बहूमोल सहभाग होता.

अनेक सांस्कृतिक उपक्रमात सहभागी असलेली सुंदर विद्या मंदीर व विद्यार्थी कोट- टायच्या गणवेशात विनायकाची मूर्त्या तयार करण्यात मग्न होते हे अचंबित करणारे क्षण सर्वांनी अनुभवले. संस्थ्येचे रुपांतर विद्या मंदिरात करणार्या उत्साही प्राचार्या निर्मल पंडित मॅडम व अनेक शालेय उपक्रमात प्राप्त पारितोषक व स्मृती चिन्हे आम्हा कार्यकर्त्यांच्या मनावर अधिराज्य करत होते !

आजच्या या कार्यशाळेचे संकल्पक गीरीधरभाई राठी, प्रकाशजी बोकील, डॉ.श्याम कुलकर्णी, सुस येथिल सामाजिक कार्यकर्ते नारायणदादा चांदोरे, कुशल संघटक डॉ.राजपूत व विठ्ठलराव सुतार सर यांची उपस्थिती होती. आमच्या संपूर्ण अभियानात प्रोत्साहित व आनंदी करणारे कांही क्षण आम्हीआज अनुभवले होते !

# की पैसा बोलता है

**ज्योतिर्मय साहित्य**

बालपणा नंतर थोडसं कळायला लागलं की शब्द समोर येतो तो म्हणजे ‘‘पैसा‘‘ आणी हळुहळु त्याच महत्व कळायला लागतं. आपली जगण्यासाठी लागणारी एक महत्वपुर्ण गरज म्हणजे पैसा.

साधं जगायला फार लागतं नाही पण सो कॉल्ड समाजात नाव इज्जत, शोहरत हवी असेल तर पैश्याचा मोठा ओघ हवा. पैसा असेल तर लोक विचारतात नाही तर कुणी साधी ओळख ही देत नाही.

स्व. पु .ल नी एके ठिकाणी म्हंटल आहे की ‘‘पैश्यानी भरलेला खिसा माणसाला जग दाखवीतो आणि रिकामा खिसा जगातली माणसं.‘‘ किती अर्थपुर्ण आणि सुंदर वाक्य आहे हे.

हा पैसा जसं कधी एखादे मैत्रीचे नातं जोडू शकतो, तसंच कधी कधी कोणतीही नाती तोडू शकतो.मग ते सख्खे बहीण भाऊ किंवा भाऊ भाऊ किंवा इतर कोणतीही. बऱ्याच ठिकाणी ,जेंव्हा घराच्या वाटण्या होतात तेंव्हाच हा पैसा फार मोठे रूप धारण करतो आणि मानवी मनाच्या स्वार्थीवृती मुळे नात्यात भिंती उभ्या करू शकतो.







पैसा माणसाना मुख्यतः दोन प्रकारात विभागतो. गरीब आणि श्रीमंत. प्रत्येकाला श्रीमंत व्हावे वाटतं पण पैसा सहसा सहज, लवकर येत नाही कारण त्या करता खुप कष्ट वेचावे लागतात.एखादा दुसरा अपवाद वगळता पैसा एका रात्रीत माणसाला मोठं करत नाही. आणि सहजा सहजी पैसा कसा मिळेल? ही मानवी प्रवृत्ती आहे. तरीही ही समाधानाची बाब म्हणजे आजकाल तरुण पिढी बऱ्याच प्रमाणात कष्ट घेते आहे आणि आपले स्वप्न साकार करण्याचा प्रयत्न करते आहे.

पैसा असला की असणाऱ्याच्या नावाला वलय प्राप्त होतं आणि पैसा नसला की तें नाव फारसं कुठं येत नाही. काहीं अपवाद वगळता पैश्यांची धुंदी चढली की माणुस माणुसकी, नाती गोती विसरतो आणि त्याकडे ‘‘मी‘‘ पणा सुरु होतो पण तो हे विसरतो की लक्ष्मी ही चंचल असते. आणि अचानक कधीतरी,काही कारणामुळे, एखादयाची ही नशा उतरली की माणुस जागा होतो सर्वस्व गमावून गेल्यासारखा पण तोपर्यंत बरीच नाती हरवून बसलेला असतो. आणि हो पैसा सर्वस्व नाही असं म्हटलं जात असलं तरी आजकालच्या काळात पैसा ही सबकुछ है हें मात्र मान्य करावे लागेल.


१९८९ मधे श्री राकेश रोशन यांनी दिग्दर्शित केलेला काला बाजार या सिनेमा मधे एक गाणे होते,नीतीन मुकेश यांनी गायलेले आणि स्व. कादर खान यांच्यावर चित्रित गाणे म्हणजे ‘‘घर घर की हैं झंकार, की पैसा बोलता है‘‘ हे मात्र या पृथ्वीवर कायम लागू आहे. आणि मृगजळाच्या मागे धावणारा माणुस नावाचा प्राणी पैश्यासाठी धावतच आहे,धावतच आहे अखंड, अविरतपणे जणु जीवन कधी कूठेतरी थांबवणार आहे ,हें विसरल्यासारखं समजून.

चला बघतो पेन्शन किती शिल्लक आहे बँकेत? गौरी, गणपती सण आलेत ना? बरीच खरेदी बाकी आहे, असे सौभाग्यवती म्हणते आहे.













## श्रीयश टेक्निकल कॅम्पसच्या ३४७ विद्यार्थ्यांची निवड, तर ४१८ विद्यार्थ्यांनी पूर्ण केली इंटर्नशिप

**ज्योतिर्मय साहित्य**

दिनांक: २८/०८/२०२५ छत्रपती संभाजीनगर येथील श्रीयश टेक्निकल कॅम्पस मधील चालू शैक्षणिक सत्रात एकूण ३४७ विद्यार्थ्यांची विविध नामांकित कंपन्यांमध्ये निवड झाली आहे. विद्यार्थ्यांना लेखी, तांत्रिक परीक्षा व मुलाखत यशस्वीरीत्या पार पाडता यावी यासाठी विशेष प्रशिक्षणही देण्यात आले होते.

या विद्यार्थ्यांची निवड बजाज ऑटो, एंड्युरन्स टेक्नॉलॉजीज, ग्रीव्हस कॉटन, भाग्यलक्ष्मी रोलिंग मिल्स, भारती एअरटेल, टीसीएस, इंडिया मार्ट लि., धूत इलेक्ट्रिकल्स, कल्याणी टेक्नोफोर्ज, धूत ट्रान्समिशन्स, लक्ष्मी अग्नी फोर्जिंग अँड कंपोनंट्स, बीजी लिन इलेक्ट्रिकल्स, एव्हर इलेक्ट्रिकल्स, मॅन ट्रक अँड बस इंडिया लि., एइसॉफ्ट इंजिनीरिंग लि., फोर्ब्स प्रिसिजन टूल्स, प्रीमियम ट्रान्समिशन, ड्युरोव्हॉल्व्ह इंडिया प्रा. लि., औरंगाबाद ऑटो अँसिलरी, प्रोफाऊंड लि., अजाईल टेक्नॉलॉजी सोल्युशन्स, हेडगेवार रुग्णालय तसेच महाट्रान्स्को, राज्य राखीव पोलीस दल व डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे अशा नामांकित कंपन्या व शासकीय आस्थापनांमध्ये झाली आहे.

४१८ अभियांत्रिकी व पॉलिटेक्निक विद्यार्थ्यांनी सुनील इंडस्ट्रीज, एलएपीएल लिमिटेडसह विविध कंपन्यांमध्ये पेड इंटर्नशिप यशस्वीरीत्या पूर्ण केली. या यशाबद्दल श्रीयश प्रतिष्ठानचे चेअरमन बसवराज मंगरुळे यांनी सर्वांचे अभिनंदन करून भविष्यात अधिक संधी देण्याची ग्वाही दिली.



# आधी वंदू तूज मोरया...

## पुण्यनगरीचे वैभव श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती

**ज्योतिर्मय साहित्य**

पुण्याला आल्यानंतर पुण्यात अनेक ऐतिहासिक धार्मिक स्थळ आहेत त्याला आपण आवर्जून भेट देत असतो. पुण्यातील असेच एक महत्त्वाचे स्थळ म्हणजे पुण्यातील श्रीमंत दगडूशेठ हलवाई ट्रस्टचे श्री गणपती मंदिर. पुण्यात आल्यानंतर ह्या गणपतीचे दर्शन घेतल्याशिवाय अनेकांना चैन पडत नाही. भक्तांच्या नवसाला पावणारा, मनाला आनंद, समाधान, देणारा गणपती म्हणून हे मंदिर महाराष्ट्रातच नव्हे तर देश-परदेशात ही प्रसिद्ध आहे. मंदिरातील सुंदरशी मूर्ती भाविकांचे श्रध्दा स्थान आहे. माझा स्वतःचा अनुभव आहे. पुण्यात आल्यावर गणपतीचे दर्शन घेणारच.

श्रीमंत दगडूशेठ हलवाई हे पुण्यातील (१८९३) सुप्रसिद्ध मिठाईचे व्यापारी होते. श्रीमंत तर होते पण भविकही होते. पुण्यातील बुधवार पेठेत हल्ली दत्त मंदिर आहे त्या जागेवरच त्यांचा रहिवास होता.. त्याकाळी पुण्यामध्ये आलेल्या प्लेगच्या साथीमध्ये श्रीमंत दगडूशेठ हलवाई यांच्या मुलाचे देहावसान झाले. त्यामुळे ते स्वतः व त्यांच्या पत्नी सौ. लक्ष्मीबाई हे दोघेही दुःखी होते. त्यावेळी त्यांचे गुरू पुज्य श्री. माधवनाथ महाराजांनी त्यांचे सांत्वन केले.(पुज्य.माधवनाथ महाराजांची समाधी साऊथ तुकोगंज. इंदोर येथे आहे) व त्यांना सांगितले की, आपण काही काळजी करू नका, आपण एक दत्ताची आणि एक गणपतीची मूर्ती तयार करा व त्यांची रोज पूजा करा. हया दोनही दैवतांना आपल्या मुलाप्रमाणे सांभाळा. भविष्यात जसे मुले आपल्या आईवडिलांचे नाव उज्ज्वल करतात त्याप्रमाणे ही दोन दैवते तुमचे नाव उज्ज्वल करतील. महाराजांनी सांगितल्याप्रमाणे शेठ यांनी दत्ताची एक संगमरवरी मूर्ती व गणपतीची मातीची मूर्ती बनवून घेतली. ह्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा लोकमान्य टिळकांच्या हस्ते झाली होती आणि त्यावेळी परिसरातील श्रीमंत दगडूशेठ हलवाई, बाबुराव गोडसे, भाऊसाहेब रंगारी, श्री. मोरप्पाशेठ गाडवे उर्फ काका हलवाई, नारायणराव बाजेवाले उर्फ जाधव, नारायणराव भुजबळ, रामाराव बुटलेर, गणपतराव विठूजी शिंदे, सरदार परांजपे, शिवरामपंत परांजपे, गोपाळराव रायकर, नारायणराव दरोडे हे या समारंभाला हजर होते.

सन १८९४ साली लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सवाची सुरुवात केली. सन १८९६ साली श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपतीची दुसरी मूर्ती तयार करण्यात आली व तिचा उत्सव होऊ लागला. श्रीमंत दगडूशेठ हलवाई यांचे निधना नंतरही गणेशोत्सवाची परंपरा त्या परिसरातील नागरिकांनी, कार्यकर्त्यांनी. त्यांनी सुरू केलेली गणेशोत्सवाची परंपरा सुरू ठेवली. या उत्सवाचे व्यवस्थापन सुवर्णयुग तरुण मंडळ करीत होते. सध्या ही मूर्ती कोंढवा येथील बाबुराव गोडसे पिताश्री वृद्धाश्रमातील मंदिरात आहे.

सन १९६७ साली आपल्या दगडूशेठ हलवाई गणपतीच्या अमृत महोत्सवानिमित्त सुवर्णयुग तरुण मंडळाच्या प्रतापराव गोडसे आदींनी गणपतीची नवीन मूर्ती बनविण्याचा संकल्प केला व त्यासाठी कर्नाटकचे प्रसिद्ध शिल्पकार श्री. शिल्पी यांना सांगितले. त्यांच्याकडून लहान मातीची मूर्ती नमुना म्हणून करून घेतली. बाळासाहेब परांजपे यांनी कार्यकर्त्यांना ती मूर्ती प्रोजेक्टरवरून मोठ्या पडद्यावर दाखविली व सर्वानुमते ती आधीच्या मूर्तीसारखी असल्याची खात्री पटल्यानंतर मोठया मूर्तीचे काम प्रत्यक्षात सुरू झाले. पूर्ण मूर्ती तयार झाल्यानंतर श्री. शिल्पी यांनी त्याकाळी जे ग्रहण झाले त्या दिवशी संगम घाटावर ग्रहण संपेपर्यंत देवाची आराधना केली,. गणेश यंत्राची पूजा केली व त्यानंतर ज्या ठिकाणी मातीची मूर्ती तयार केली होती, त्याच ठिकाणी येऊन विधिवत धार्मिक गणेश याग केला, व त्यानंतर ते सिद्ध श्रीयंत्र मंगलमूर्तीच्या पोटामध्ये सर्वांसमक्ष ठेवले. शिल्पी यांनी जमलेल्या लोकांना या मंगलमूर्तीची तुम्ही सर्वांनी दररोज नित्य नियमाने पूजा करा व त्याचे शेवटपर्यंत पावित्र्य राखा असे सांगितले. त्याकाळी ही मूर्ती बनविण्याचा खर्च सुमारे ११२५/- इतका आला होता.

हा गणपती लोकमान्य टिळक यांचा काळात बसवला गेला.

ही मूर्ती तयार करण्याचे काम सुरू असताना त्यावेळी सूर्यग्रहण आले होते. त्या ग्रहणातील एका विशिष्ट वेळेत मूर्तीमध्ये गणेशयंत्र बसविले तर त्या मूर्तीचे तेज उत्तरोत्तर वाढत जाईल आणि या मूर्तीला देवत्व प्राप्त होईल अशी शिल्पी यांची श्रद्धा होती. त्यांच्या श्रद्धेचा मंडळाच्या कार्यकर्त्यांनीही आदर केला आणि धार्मिक पद्धतीने विधी करूनच ही मूर्ती घडविण्यात आली. शांत, प्रसन्न आणि पाहताच पावले थबकून राहावीत असे भाव या मूर्तीच्या






चेहऱ्यावर आहेत. बैठय़ा मूर्तीचे चारही हात सुटे असून डाव्या हातामध्ये मोदक आहे, तर उजवा हात वरद म्हणजे आशीर्वाद देणारा आहे. अन्य दोन हातांमध्ये कमळ आणि डोक्यावर मुगूट आहे. मूर्तीच्या सोंडेवरील नक्षीकाम हाही उत्कृष्ट कलाकारीचा नमुना आहे. या मूर्तीचे डोळे हे महत्त्वाचे वैशिष्ट्य़. या डोळ्यांमध्येच मूर्तीची प्रसन्नता, सात्त्विकता आणि उदात्तता एकवटली आहे. कोठूनही पाहिले तरी गणपती आपल्याकडेच पाहात आहे याची प्रचिती दर्शन घेणाऱ्या भाविकाला येते. मूर्तीच्या बोलक्या डोळ्यांमधून व्यक्त होणारे भाव पाहून भक्त नकळतच नतमस्तक होतो.मंदिरातून लवकर पायच निघत नाही.

उत्सव काळात पाच किंवा अकरा नारळाचे तोरण अर्पण करण्यासाठी भाविकांची दर्शनासाठी रांग लागलेली असते. हे दगडूशेठ गणपतीचे एक खास वैशिष्ट्य़ आहे. १९८४ मधील गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर मंदिरामध्ये गणपतीची स्थापना झाली. या मंदिरासाठी ट्रस्टचे तत्कालीन अध्यक्ष प्रतापराव गोडसे, मामासाहेब रासने आणि आप्पासाहेब सूर्यवंशी यांनी केलेल्या प्रयत्नांना यश आले.

'कुली' चित्रपटाच्या चित्रीकरणादरम्यान अमिताभ बच्चन यांना जीवघेणा अपघात झाला होता. त्यावेळी जया बच्चन यांनी दगडूशेठ गणपतीचे दर्शन घेऊन नवस केला होता. सुखरूप बरे झाल्यानंतर अमिताभ आणि जया बच्चन या दांपत्याने सोन्याचे कान अर्पण केले होते.अनेक कलाकार, राजकिय नेते दर्शनाला, येतात.

आधिचे मंदिर अपुरे पडू लागल्यानंतर २००२ मध्ये सध्याचे भव्य मंदिर उभारण्यात आले. ट्रस्टच्या तीनही प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या पुढच्या पिढीच्या हाती सध्या नेतृत्व आहे. त्यांनीही त्याच निष्ठेने आणि भाविकतेने सारे उपक्रम सुरू ठेवले आहे. गणपतीचे पावित्र्य जपले असून ट्रस्टच्या लौकिकामध्येही भर घातली आहे. स्वच्छता, शिस्त,कौतुकास्पद आहे.

गणेशोत्सव हा केवळ आपल्या मंडळापुरताच मर्यादित राहू नये या उद्देशाने उत्सवाला विधायक वळण प्राप्त करून देण्यासाठी ट्रस्टने राष्ट्रीय गणेशोत्सव स्पर्धा सुरू केली. गणेशोत्सवामध्ये ऋषिपंचमीला हजारो महिलांचा सहभाग असलेला अथर्वशीर्ष उपक्रम जगभर पोहोचला आहे.उत्सव काळात व इतरही वेळी गणेशयाग, आदी कार्यक्रम असतात.

ट्रस्टतर्फे कोंढव्यामध्ये देवदासी आणि अनौरस मुलांचा सांभाळ करून त्यांना योग्य शिक्षण देणारे बालसंगोपन केंद्र आणि पिताश्री वृद्धाश्रम चालविण्यात येत आहे. पिगोरी (ता. पुरंदर) गावामध्ये जलसंधारणाची कामे यशस्वी केलेल्या ट्रस्टतर्फे ससून रुग्णालयातील रुग्णांना उत्तम भोजनसेवा दिली जात आहे.धार्मिक, सामाजिक, व आरोग्य सेवा ह्या माध्यमातून संस्थेचे मोलाचे योगदान आहे.

ट्रस्टतर्फे दरवर्षी सादर केला जाणारा आकर्षक देखावा आणि केलेली विद्युत रोषणाई हा भाविकांना आकर्षीत करुन घेते. भाविकांनी अर्पण केलेल्या सोन्यातून दगडूशेठ हलवाई गणपतीसाठी ४० किलो वजनाचे नवीन अलंकार करण्यात आले आहेत. साडेनऊ किलो वजनाचा रत्नजडित सुवर्णमुकूट, सूर्यकिरणांची नक्षी असलेले व रंगीत रत्नखडे जडवलेले कान, सातशे ग्रॅम वजनाचे शुंडाभूषण यासह रेशमी वस्त्रावर सोन्याच्या बुट्टया विणून तयार केलेला पोशाख व उपरणे या गणेशोत्सवात मूर्तीस अर्पण करण्यात आले. पु. ना. गाडगीळ सराफ पुणे, यांनी हे अलंकार घडवले आहेत. ५० कारागिरांनी पाच महिन्यात हे काम केले.

अगदी रस्त्यावरून जाणाऱ्या पादचाऱ्यांसही गणपती दर्शन अगदी सुंदर होते. उत्सवाचे काळात तसेच इतर वेळीही वर्षभरात दिलेल्या देणगीची पावती, प्रसाद, फोटोसह दिली जाते.तसेच तीर्थ, साखरफ ुटाण्याचा प्रसादही नेहमी करता ठेवलेला असतो. आपण मुक्तपणे दर्शन घेऊ शकतो. अथर्वशीर्ष चा पाठ तसेच जप गणपती समोर बसून करू शकतो आणि आनंद मिळवू शकतो.

यावर्षी श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्ट तर्फे पद्मनाभ स्वामी मंदिराची प्रतिकृती उभारली असून सुंदर असा देखावा केला आहे

उत्सवाच्या काळात अनेक कार्यक्रमाचे आयोजन संस्थान तर्फे करण्यात येतात.

श्री गजानन जय गजानन.

।। ॐ गं गणपतये नमः ।।

## !! उंदीर झाले गणपतीचे वाहन !!

**ज्योतिर्मय साहित्य**

सर्व देवांच्या राजा इंद्र यांनी सर्व ऋषीमुनींची मोठी सभा बोलावली. त्या सभेला आपणही जावे असे क्राँच नावाच्या गंधर्वाला वाटले. गंधर्व हा हुशार होता पण त्याला त्याच्या ज्ञानाचा थोडा अधिकच गर्व झालेला होता. त्यामुळे क्राँच त्या इंद्राने बोललेल्या सभेत सहभागी झाला. तो वामदेव नावाच्या ऋषीच्या शेजारी जाऊन बसला. नामदेवांची पांढरी शुभ्र दाढी ही क्राँच गंधर्वाच्या मांडीस गुदगुल्या करीत होती. त्याची दाढी आपल्या मांडीला लागू नये म्हणून त्याचे दोन-तीन वेळा त्याने मांडीही बदलली पण तरी त्याची दाढी लागतच होती. तो रागवला त्याला सभेचे भान न राहिल्याने त्याने वामदेव ऋषींना सभेच्या ठिकाणी लाथ मारली. ही गोष्ट इंद्राच्या नजरेतून सुटली नाही. इंद्र देवाचा संताप अनावर झाला त्याने हा ऋषी नाही गंधर्व आहे हे ओळखले. तरी त्यांनी ही गोष्ट त्याच्या तोंडून सभेत कळावे म्हणून त्यांनी विचारले. हे मुनीवर मी आपणास ओळखले नाही. आपण आपला परिचय सभेत करून द्यावा तसेच आपण लाथ का मारली याचा खुलासा करावा. इंद्राच्या लक्षात ही गोष्ट आल्यामुळे क्राँचच्या ध्यानात आले आणि तो खूप घाबरला इंद्र देवांना नमस्कार करीत क्राँच म्हणाला हे देवाधि देवा इंद्र देवा मी ऋषीमुनी नाही मी एक गंधर्व आहे. माझी लाथ चुकून वामदेवांना लागली हे ऐकल्यावर इंद्रदेव विलक्षण संतापले आणि क्राँच ला म्हणाले एक तर तू ऋषी नसताना या ऋषीच्या ज्ञानपूर्ण अशा सभेस आला. वामदेवत ना ला चुकून लाथ लागली असे खोटे बोलत आहे. मी तुला शाप देत आहे तू उंदीर होशील. इंद्राने दिलेला हा भयंकर शाप ऐकल्यावर क्राँच घाबरला तो इंद्रजवळ जाऊन उ:शापासाठी विणवणी करू लागला. त्यावर इंद्रदेव म्हणाले तुझी ज्ञानाची हौस इच्छा पाहून मी तुला उ:शाप देतो की तुझ्या डोक्यावर सदैव बुद्धिमत्ता चा वरदहस्त असेल इंद्राचे हे बोलणे होताच काँच गंधर्व लहान लहान होत त्याचे उंदरात रूपांतर झाले. तो उंदीर पाहता पाहता उड्या मारत पराशर ऋषींच्या आश्रमात गेला पराशर ऋषींच्या आश्रमात आल्यानंतर त्या उंदराने आपले प्रताप दाखवण्यास सुरुवात केली. त्या ठिकाणी असलेल्या फळांची, धान्याचे, नासधूस करायला सुरुवात केली. त्याचबरोबर त्या ठिकाणी ऋषीमुनीच्या वस्तू आसने कुर्तडण्यास सुरुवात केली. एवढेच नव्हे तर ऋषींच्या शिष्यांची वस्त्रे




दाढी कुरतडून टाकण्यास सुरुवात केली. तेव्हा मात्र पराशर ऋषीनी या उंदरास पकडण्यासाठी त्याने गणपतीचे प्राचारण केले. गजानन पराशर ऋषीच्या आश्रमात आल्यावर त्या उंदराला फास टाकून पकडले. त्यावेळी तो उंदीर म्हणाला तू मला फासात अडकून पकडलेस यामध्ये तुझे काय मोठेपण आहे. त्यावर गणपती म्हणाला तू या सर्व ऋषीमुनींना त्रास देणे सोड तरच मी तुला सोडून देईन. त्यावर तो उंदीर म्हणाला मी माझ्या दिनचर्येतील एक गोष्ट नियमितपणे करीत आहे. उलट हे ऋषीच मला माझ्या दिनचर्येत अडथळा आणून त्रास देत आहेत. हे ऐकून गणपतीला खूप हसू आले. त्यावर गणपती खुश होऊन उंदराला म्हणाला माझ्यापाशी काय पाहिजे ते मागावे. त्यावर तो गर्विष्ठ उंदीर म्हणाला तू मला म्हणतोस. तुला काही वर मागायचा असल्यास तू माझ्यापाशी माग. त्या उंदराचे बोलणे ऐकून गणपतीस हसू आले. गणपती म्हणाला मी वर मागू काय ... देशील ना.. पहा मग.. हो.. हो.. उंदीर म्हणाला.

त्यावर गणपती म्हणाला आजपासून तू माझे वाहन होशील. त्यावर उंदराने समाधानाने मान हलवली आणि तो म्हणाला हो अशा तऱ्हेने उंदीर हे गणपतीचे वाहन झाले.

## एक संवाद : बाप्पाशी ...

**ज्योतिर्मय साहित्य**




गजानना, गणराया, मंगलमुर्ती असलेल्या बाप्पा, तुझे मनापासून स्वागत. अरे, किती दिवसांपासून वाट पाहत असतो आम्ही तुझी. तुझ्या स्वागतासाठी आबालवृद्ध सारेच उत्सुक असतात. तू आलास ना बाप्प्पा की काय जादूची कांडी फिरवतोस ते तुलाच माहिती बाबा. पण सगळे वातावरणच बदलून टाकतोस. कालपर्यंत शांत शांत असलेले सारे वातावरण मंगलमय होऊन जाते. तू येताना चैतन्य घेऊन येतोस. आणि खरेच मंगलमुर्ती असलेला तू आमची मनेही भक्तिमय करून टाकतोस. तू येतोस फक्त दहा दिवस. पण जणू काही आमच्या घरातील एक सदस्यच तू होऊन आलेला असतोस. म्हणून तर तू जेव्हा जातोस ना तेव्हा आमच्या डोळ्यांच्या कडा नकळत ओलावतात. एखाद्या आईबाबांचा मुलगा वर्षभर परदेशात जावा, त्याच्या वाटेकडे त्यांनी वर्षभर डोळे लाऊन बसावे, आणि मग त्याचा निरोप यावा. हो, मी येतोय. मला सुटी मिळालीय. दहा-बारा दिवसांचीच आहे. हे ऐकल्यावर त्या आईबाबांचा हर्ष गगनात मावत नाही. त्याला आल्यावर कुठे ठेवू आणि कुठे नको असे त्यांना होऊन जाते. तसेच, अगदी तसेच रे बाप्पा, तसेच आतुरलेले असतो आम्ही. तुझी वाट पाहत असतो, तुझ्या स्वागताची तयारी करीत असतो. पण खरे तर तू येतही नाहीस आणि जातही नाहीस. तू आत्मरूपाने सदैव राहतोस. या सृष्टीच्या चराचरात तू आहेस. पण तुझे हे प्रतिकात्मक आगमन आम्हाला प्रेरणा देणारे असते.

तुझ्या अवताराची कथा मोठी रम्य आहे. माता-पार्वतीने एका विशिष्ट उटण्यापासून, एक प्रकारच्या विशिष्ट माती पासून तुझी मूर्ति तयार केली असे सांगितले जाते आणि त्या मूर्तीला त्या आदिशक्ती पार्वतीने स्पर्श केला आणि गणेशा तू अवतीर्ण झालास. भगवान शंकरांनी तुला वर दिला की यापुढे तू गजमुख, गणेश, विनायक अशा नावाने ओळखला जाशील आणि पूजा, यज्ञादी पवित्र कार्यात तुझी प्रथम पूजा केली जाईल. तुला प्रथम पूजेचा मान मिळेल. तेव्हापासून हे मंगलमूर्ती, कोणत्याही कार्याची सुरुवात तुझ्या पूजेशिवाय होत नाही. भक्त तुला आवाहन करतात आणि प्रार्थना करतात की हे गणराया तू प्रसन्न होऊन हे कार्य सिध्दीस न्यावे आणि या कार्यातील संकटे दूर करावीत आणि तू ती करतोस.

भाद्रपद महिन्यात येणाऱ्या गणेश चतुर्थीला आम्ही तुझी पार्थिव मूर्ती घरी आणतो आणि तिचे पूजन करतो. पार्थिव म्हणजे जड असे आम्ही समजतो. पण खरे म्हणजे त्या पार्थिवात चैतन्याचा अंश असतो. अनेक वर्षे एखाद्या शिलेप्रमाणे पडून राहिलेल्या अहल्येला श्रीरामांच्या चरणांचा पावनस्पर्श झाला आणि त्या जड पाषाणामध्ये चैतन्य निर्माण झाले. जाणिवेचा, शक्तीचा स्पर्श झाल्यावर त्यातून अहल्या बाहेर आली. तुझी पार्थिव मूर्ती ही या सृष्टीमध्ये अस्तित्वात असलेल्या पंचमहाभूतांपासूनच निर्माण होते. ज्यांचा या चराचरामध्ये ईश्वरी शक्तीचा वास आहे असा विश्वास आहे, अशा व्यक्तींना तुझी ही पार्थिव मूर्ती त्या ईश्वरी शक्तीचेच प्रतीक आहे असा विश्वास असतो. तुझ्याशी ते एकरूप होतात. तुला ते आपल्यातीलच एक समजतात आणि आपली सुखदुःखे तुझ्याजवळ मोठ्या विश्वासाने तुझ्याकडे व्यक्त करतात. तू त्यांचे दुःख निवारण करशील, समृद्धी आणि ज्ञान प्रदान करशील आणि सर्व जीवन मंगलमय करशील अशी त्यांची भावना असते. तुझ्या प्रति दृढ श्रद्धा असते.

अनंत चतुर्दशीच्या दिवशी तुझ्या पार्थिव मूर्तीचे जलामध्ये विसर्जन केले जाते. बा गजानना, आम्ही म्हणजे तुझ्या भक्तांनी हे लक्षात ठेवायला हवे की तुझी मूर्ति मातीची असेल तरच ती निसर्गशी एकरूप होऊ शकते. म्हणजेच तुझी मूर्ति जर अनैसर्गिक वस्तूंपासून तयार केलेली असेल, तर ती जलामध्ये विरघळू शकत नाही. जलाचा अपार साठा असलेल्या समुद्रातही ती विरघळू शकत नाही. ज्या चैतन्यातून तुझी मूर्ति निर्माण झाली आहे ते चैतन्य पुन्हा निसर्गात विसर्जित होऊ शकत नाही. खरंतर पावसाळ्याच्या या दिवसात ओल्या मातीपासूनच तुझी मूर्ति करणे अपेक्षित असते, नाही का ? जे स्वतःला निसर्गप्रेमी म्हणवतात त्यांनी तरी ही गोष्ट ध्यानात घेतली पाहिजे आणि अनैसर्गिक गोष्टींपासून तुझ्या मूर्ती तयार करणे थांबवले पाहिजे.


विश्वास देशपांडे
चाळीसगाव

तुझ्या मूर्तीचे जे पूजन आम्ही करतो, प्राणप्रतिष्ठा करतो तेव्हा तुझी मूर्ती चैतन्याने भारीत होते. जेव्हा ही मूर्ती पाण्यामध्ये विसर्जित होते, तेव्हा हे चैतन्य जलामध्ये मिसळते आणि पाण्याच्या माध्यमातून त्याची वाफ होऊन आकाशापर्यंत जाते आणि पावसाच्या रूपाने हे पाणी परत पृथ्वीकडे येते. या सृष्टीमध्ये असलेले तुझे अस्तित्व कधीच नष्ट होत नाही, होऊ शकत नाही. अशा प्रकारे हे गजानना तुझे आशीर्वाद आम्हाला पुन्हा पुन्हा प्राप्त होत असतात. हा केवढा मोठा चमत्कार आहे ! **(क्रमशः)**

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559